# 1 डिसेंबर

## आजचा सुविचार :

“जो काळानुसार बदलतो तोच नेहमी प्रगती करतो.”

## आजचे पंचांग :

वार – बुधवार
तिथी - कार्तिक कृ
नक्षत्र – चित्रा
सूर्योदय – सकाळी 6.57 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 5. 58 वाजता

## आजचे दिनविशेष :

**1965 :** भारतीय सीमा सुरक्षा दल (बोर्डर सिक्युरिटी फोर्से – बिएसएफ) ची स्थापना झाली.
**1981 :** AIDS विषाणूची प्रथमच ओळख पटली.
**1999 :** भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांना वूमन ऑफ द मिलेनियम म्हणून मानांकित करण्यात आले.
**1866 :** भारताचे सर्वेक्षण करणारे कर्नल सर जॉर्ज एव्हरेस्ट यांचे निधन.
**1990 :** राजदूत, मुत्सद्दी व राजकारणी विजयालक्ष्मी पंडीत यांचे निधन.

## आजचे इंग्लिश शब्द : ( अवकाशातील मित्र ) :

**1) Moon – चंद्र 2) Sun - सूर्य 3) Star – चांदणी 2) Planet - ग्रह 3) Comet – धुमकेतू**

## आजची प्रश्नमंजुषा :

**1) पाण्यामध्ये राहणाऱ्या 4 प्राण्यांची नावे सांगा. 2) शब्दांच्या जाती किती व कोणत्या?**
**3) 16 x 8 = किती? 4) वनस्पतीपासून मिळणाऱ्या आहार पदार्थांची नावे सांगा.?**
**5) पृथ्वीच्या मध्यातून जाणा-या काल्पनिक रेषेस काय म्हणतात?**

## बोधकथा :

### वेळेचे महत्त्व

एक स्वार आपल्या घोड्याला खरारा करून त्याच्यावर खोगीर घालत असता घोड्याच्या एका पायाच्या नालाचा एक खिळा सुटून पडला आहे असे त्याला दिसले. पण तेथे दुसरा खिळा बसविण्याचे काम त्याने मागे टाकले. काही वेळाने लढाईवर जाण्याचे इशारे देण्याचे शिंग वाजू लागताच तो स्वार आपल्या घोड्यावर बसून लढाईच्या जागेकडे निघाला. त्या फौजेच्या सेनापतीने हुकूम सोडला की, ‘सर्वांनी आपले घोडे भरधाव सोडून शत्रूंवर तुटून पडावे व त्यांचा पाठलाग करावा.’ हुकमाप्रमाणे तो स्वार आपला घोडा उडवीत चालला असता खिळा पडल्यामुळे सैल झालेला घोड्याचा नाल गळून पडला व त्यामुळे घोडा लंगडत लंगडत चालू लागला. लंगडताना एका दगडावर त्याचा पाय आपटल्यामुळे स्वार घोड्यावरून खाली पडला व तो शत्रूच्या हाती सापडताच शत्रूने लगेचच त्याला मारले.

**तात्पर्य:– जेव्हाचं काम तेव्हा न करता ते आळसाने पुढे ढकलणे ही सवय वाईट व घातक आहे.**